ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख ४ एप्रिल, १९५६ अंक १४

## विविध माहिती

**रशिआच्या बाँडसना भाव आला**—१९१७ साली रशिआंत क्रांति झाल्यावर कम्युनिस्ट सरकारनें झारच्या सरकारनें काढलेलीं परदेशांचीं कर्जें रद्दबातल ठरविलीं होतीं. आजतागायतचें व्याज जमेस धरल्यास सुमारें ३०० कोटी पौंडांचें देणें होईल. ह्यांपैकी दोन तृतांआंश रक्कम क्रांतिपूर्व सरकारच्या बाँडसमध्यें ब्रिटिश सरकारनें गुंतविलेली होती व बाकीची खाजगी व्यक्तींनीं गुंतविलेली होती. रशिअन नेत्यांच्या ब्रिटन-मधील भेटींत ह्या देण्याची चर्चा होण्याची अफवा उठल्यानें बाँडसचा भाव सुधारला आहे.

**अमेरिकन चित्रपटाबद्दल गाऱ्हाणें**—अमेरिकेच्या सिनेट-च्या एका उपसमितीकडे बाल गुन्हेगारांबद्दल चौकशी करण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें. समितीनें एक वर्षभर अभ्यास करून असें मत व्यक्त केलें आहे कीं, अमेरिकेंत गुन्हा हा विषय असलेल्या बोलपटांचें उत्पादन वाढत आहे. अत्याचार, क्रौर्य व पशुता अशासारख्या गर्हणीय वृत्तींना प्राधान्य देण्यांत आलेल्या बोलपटांमुळें बालमनावर विपरीत परिणाम होतो, असा समितीचा अभिप्राय आहे.

**रशिआंतील टेलिव्हिजन केंद्रें**—१९६० सालअखेर रशिआंत ७५ दूर-दर्शनकेंद्रें उभारण्यांत येणार आहेत. १९५८ सालापासून रंगीत दूर-दर्शन केंद्रें चालू करण्यांत येतील. सध्यां रशिआंत अशीं अवघीं १२ केंद्रें आहेत. मास्को, लेनिनग्रॅड व संघ-राज्यांतील उपराज्यांचीं राजधानींचीं शहरें, अशा केंद्रांना एकमेकांशीं जोडण्यांत येणार आहेत.

**कामगार विमा-योजना**—कामगार-विमा योजनेची व्याप्ति आणखी २२ नव्या भागांत वाढविण्यांत आल्यामुळें ८५,००० कामगारांना त्याचा फायदा मिळूं लागेल. ३१ मोठ्या शहरांतील १०·५ लाख कामगारांना योजनेचा फायदा पूर्वींच मिळत होता. दरमहा ४०० रुपयांपेक्षा अधिक नाहीं इतका पगार मिळ-विणाऱ्या व २० पेक्षा अधिक कामगार कामावर ठेवणाऱ्या औद्योगिक कारखान्यांतील मजुरांना योजना लागूं करण्यांत आली आहे.

**म्हैसूरचें विमा-खातें**—म्हैसूर सरकारच्या विमा-खात्याचा कारभार चालू ठेवण्यांत यावा, असें मत मुख्यमंत्री श्री. हनुमंतय्या ह्यांनीं व्यक्त केलें आहे. आयुर्विमाव्यवसायाचें राष्ट्रीयीकरण अमलांत आणावयाचें झाल्यास म्हैसूर सरकारच्या विमाखात्या-च्या ताब्यांत असलेली ५ कोटी रुपयांची जिंदगी अखिल भारतीय कॉर्पोरेशनच्या नांवावर करून द्यावी लागेल, अशी माहिती त्यांनीं सांगितली.

**कॅन्सर हुडकणारें उपकरण**—झेकोस्लोव्हाकिआंतील एका संशोधन शाळेंत कॅन्सरचा उद्भव शोधून काढणारें एक उपकरण तयार करण्यांत येत आहे, असें समजतें. ह्या यंत्राच्या साह्यानें मनुष्याच्या शरीराच्या कोठल्याहि भागांत कॅन्सरचा प्रादुर्भाव झाला असल्यास त्याचा तात्काळ पत्ता लागूं शकेल, असें म्हणतात.

**साखरेच्या उत्पादनांत वाढ**—भारतीय सरकारचे अन्न-मंत्री श्री. जैन ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत देशांतील साखरेचें उत्पादन १७ लाख टनांवरून २५ लाख टनांपर्यंत वाढलेलें असेल. आतांपर्यंत ५२ नवे कारखाने काढण्याचे परवाने देण्यांत आले आहेत. ह्या नव्या कारखान्यांतून दरसाल ८,१०,००० टन साखर निर्माण होऊं शकेल.

**भोपाळ येथें कारखाना**—भोपाळ येथें भारी विद्युतयंत्रांची निर्मिति करणाऱ्या कारखान्याची स्थापना करण्याची तज्ज्ञांचीं शिफारस भारतीय सरकारनें स्वीकारली आहे. मद्रास येथील हवामान बहुतेक वर्षभर उष्ण व दमट असल्यामुळें तेथें हा कारखाना काढणें सोयीचें होणार नाहीं, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. मद्रासमध्यें कारखाना काढल्यास यंत्रसामुग्रीला धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे.

**क्ष-किरण यंत्रांचा कारखाना**—क्ष-किरणांचा उपयोग करून फोटो घेणारीं यंत्रें तयार करण्याचा व शस्त्रक्रियेसाठी लागणारीं हत्यारें तयार करण्याचा कारखाना काढण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारतीय सरकारनें एक कमिटी नेमली आहे. सध्यां क्ष-किरणांचीं फारच थोडीं उपकरणें भारतांत तयार होतात.

**कामाच्या तासांत कपात**—पूर्व जर्मनीच्या कम्युनिस्ट सरकारनें १९५६–६० च्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कामगारांना अधिक सवलती देण्याचें ठरविलें आहे. कामाचे तास कमी कर-ण्यांत येऊन, पेन्शनच्या रकमेंत वाढ करण्यांत येणार आहे. अधिक चांगले कपडे पुरविण्याचेंहि आश्वासन देण्यांत आलें आहे.

**नागपूर कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—नागपूर कॉर्पोरे-शननें येत्या आर्थिक वर्षांत शिक्षण व सार्वजनिक आरोग्य ह्या बाबींवर अधिक भर देण्याचें ठरविलें आहे. उत्पन्नाच्या बाजूला १,१८,८५,८२९ रुपये दाखविण्यांत आले असून खर्चाच्या बाजूला २,५४, ८३,६८५ रुपयांची रक्कम दाखविण्यांत आली आहे.

**दुर्गापूर येथील पोलादाचा कारखाना**—ब्रिटनच्या मदतीनें दुर्गापूर येथें काढण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्याविषयीं भारत व ब्रिटन ह्यांच्या दरम्यान येत्या जुलै महिन्यांत करार होण्याचा संभव आहे. कारखान्यासाठी ५ कोटी पौंड भांडवल लागणार. आहे. त्यांतील १॥ कोटी पौंड भांडवल कांहीं ब्रिटिश बँका भारताला कर्जाऊ देणार आहेत. कारखान्याचें संकल्पित उत्पादन दरसाल १० लाख टन आहे.

**संतति प्रतिबंधाचीं साधनें**—संतति प्रतिबंधक रासायनिक औषधांवर औषधांच्या कायद्यान्वयें नियंत्रण ठेवण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. अशीं साधनें नियंत्रणें बसल्यावर अधिकृत परवानेवाल्यांनाच विकतां येतील. रबरी साधनें आरोग्याला हानिकारक नसल्यानें त्यांच्या विक्रीवर मात्र नियंत्रण ठेवण्याचा सरकारचा इरादा नाहीं.

**निर्यात वाढविण्यासाठी**—कातडी व चामडी, अभ्रक आणि लाख ह्या पदार्थांची निर्यात वाढविण्यासाठी तीन 'निर्यात समित्या' लवकरच स्थापन होण्याचा संभव आहे. १९५५ सालीं भारतानें २२·२५ कोटी रुपये किंमतीची कातडी ८·०५, कोटी रुपयांचें अभ्रक आणि २२·५७ कोटी रुपयांची लाख परदेशीं निर्यात केली होती. लाख व अभ्रक ह्यांच्या समित्या कलकत्त्यांत आणि कातड्याची समिति मद्रासमध्यें स्थापन करण्यांत येईल.

**विशाखापट्टम वाढूं लागलें**—आंध्रमधील विशाखापट्टम हें गांव राज्यांतील मोठें औद्योगिक शहर बनूं लागलें आहे. सध्यां तेथें हिंदुस्थान शिपयार्ड हा एकच बडा कारखाना आहे. पण शहरापासून जवळच काल्टेक्स ऑइल कंपनी आपला नवा तेल शुद्ध करण्याचा कारखाना काढीत आहे. त्यासाठी १२ लाख रुपये खर्च येईल. त्याशिवाय रेल्वेचे डबे बांधण्याचा एक कारखाना आणि विजेची भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखानाहि काढण्यांत येणार आहे.

**भारततर्फे दिली जाणारी मदत**—भारतीय सरकारनें आपल्या १९५६–५७ सालच्या अंदाजपत्रकांत कोलंबो योजनेप्रमाणें द्यावयाच्या आर्थिक मदतीसाठी १४४·८२ लाख रुपये आणि तांत्रिक मदतीसाठी २६ लाख रुपयांची तरतूद केली आहे. ही मदत ब्रह्मदेश, कांबोडिआ, सीलोन, नेपाळ, पाकिस्तान, फिलिपाइन्स, व्हिएटनाम, सिंगापूर, इत्यादि देशांना मिळणार आहे.

**किनाऱ्यानजीकची वाहतूक**—भारताच्या किनाऱ्यानजीकची वाहतूक करण्यासाठी भारतीय कंपन्यांनीं ६ परदेशी बोटी भाड्यानें घेतलेल्या आहेत. सर्व बोटींचें मिळून वजन ४६,००० टन आहे. परदेशी बोटींची मदत घेतल्यामुळें भारताला एक वर्षांत सुमारें १·०६ कोटी रुपये परदेशी हुंडणावळींत द्यावे लागतील. तथापि, त्या बोटींऐवजी भारतीय बोटी लवकरच वापरण्यांत याव्यात म्हणून अट घालण्यांत आली आहे.

**उन्हाळी झऱ्यांचा विकास**—भारतामध्यें पुष्कळ ठिकाणीं गंधकमिश्रित पाण्याचे उन्हाळी झरे आहेत. अशा १२ झऱ्यांचा आरोग्यदायक ठिकाणें म्हणून विकास करण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे. १९५५ च्या जानेवारींत कांहीं रशिअन डॉक्टर्स भारतांत आले असतां त्यांनीं ह्याविषयीं कांहीं शिफारशी केल्या होत्या. त्यावेळीं बिहार व पंजाबमधील उष्ण कुंडांच्या ठिकाणीं ते गेले होते.

## घरबांधणीस मदत करण्यासाठी सहकारी बँक

### पूर्वतयारीस प्रारंभ

पुणें जिल्ह्यांतील व शहरांतील नवीन घरें बांधणेकरितां अगर जुन्या घरांच्या दुरुस्तीकरितां कर्ज देण्यासाठी सहकारी तत्त्वावर बँक काढावी किंवा कसें, याचा विचार करण्याकरितां पुण्यांतील नागरिकांची दिनांक १८ मार्च, १९५६ रोजीं पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. के. पी. जोशी, वकील यांचे अध्यक्षतेखाली सभा भरली होती.

सुरुवातीस श्री. रबडे यांनीं उपस्थित मंडळींचें स्वागत करून घर बांधणें, घरांच्या दुरुस्त्या करणें, वगैरेंकरितां कर्ज मिळण्यास कोणत्या अडचणी येतात हें सांगून अशा बँकेची कशी जरूरी आहे हें सांगितलें. या बाबतींत निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें व साधकबाधक चर्चा होऊन एकमतानें अशी बँक काढावी असें ठरलें. बँकेची घटना व नियम करण्यासाठी ८ गृहस्थांची एक कमिटी नेमली गेली असून त्यांनीं हें काम एक महिन्यांत पुरें करावें असें ठरलें. या कमिटींत पुढील सभासद आहेत: (१) श्री. के. पी. जोशी, (२) श्री. ग. र. तुळशीबागवाले, (३) श्री. वि. ज. करंदीकर, (४) श्री. द. दि. चितळे, (५) श्री. एस. व्ही. कुलकर्णी, (६) श्री. मो. वि. रबडे, (७) श्री. वि. म. कान्हेरे, (८) श्री. व्ही. व्ही. शहाडे.

या समितीला आणखी सभासद नेमून घेण्याचा अधिकार दिला आहे. याप्रमाणें सभेचें काम होऊन श्री. शहाडे यांनीं उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभेचें काम संपलें.

ह्याबाबतींत कांहीं अधिक माहिती पाहिजे असल्यास केंजळे बिल्डिंग, लक्ष्मी रोड, डॉ. सोमण यांचे दवाखान्यांत पुणें २ येथें चौकशी करावी. (वेळ दुपारीं २ ते ४)

---

## बुद्धिमान् व गरीब विद्यार्थ्यांची पुणें अनाथ विद्यार्थी गृहांत सोय

पुणें अनाथ विद्यार्थी गृहाच्या पुणें व नाशिक शाखांमध्यें थोडे नवीन विद्यार्थी घ्यावयाचे आहेत. त्यासंबंधीं अटी:—

(१) वय १२ ते १५; (२) इयत्ता किमान मराठी ७ वी पूर्ण; (३) नेहमीं शेंकडा ६० पेक्षा अधिक मार्क व वयाचे प्रमाणांत शिक्षण आणि (४) खरोखर गरिबी.

वरील अटींत बसणाऱ्या विद्यार्थ्यांनींच चार आणे पोस्टेज पाठवून छापील अर्जनमुना मागवून तो दि. ३०–४–५६ चे आंत भरून पाठवावा. अर्जनमुना मागवितांना पुढील माहिती पाठविलीच पाहिजे :—

(१) जन्म दिनांक; (२) या वार्षिक परीक्षेंत पूर्ण झालेलें अगर होणारें शिक्षण; (३) नेहमीं परीक्षेंत मिळणारे किंवा यापूर्वी झालेल्या परीक्षेंतील शेंकडा मार्क.

कांहीं अर्धसनाथ विद्यार्थीहि संस्थेंत घ्यावयाचे आहेत. त्यांना जागा, दिवाबत्ती व देखरेख हीं मोफत मिळतील. अन्नखर्च, फी, इत्यादि बाकीचा खर्च ज्याचा त्यास करावा लागेल. अशा विद्यार्थ्यांनींहि वरीलप्रमाणेंच दि. २५–५–५६ पर्यंत अर्ज करावेत.

पुणें अ. वि. गृह
६२४, सदाशिव, पुणें २.
दि. २४–३–५६

ग. श्री. खैर,
कार्याध्यक्ष

# अर्थ

बुधवार, ता. ४ एप्रिल, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताला ब्रिटनकडून होत असलेली मदत

ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडवर सरकारी प्रतिनिधी म्हणून काम पहाणारे मंत्री श्री. लो ह्यांनीं भारत व ब्रिटन ह्या राष्ट्रांत १९४७ नंतर होत असलेल्या व्यापारी देवघेवीसंबंधीं कांहीं माहिती प्रकट केली आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या कालांतील उभयतां राष्ट्रांतील व्यापारी संबंधांसंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं ब्रिटन आणि भारत ह्यांच्यामधील व्यापार वाढत चाललेला आहे. १९५४ मध्यें ब्रिटननें भारताला जितका माल निर्यात केला त्यापेक्षा १९५५ मध्यें १·५ कोटी पौंड किंमतीचा अधिक माल निर्यात केला. १९५६ च्या पहिल्या तिमाहींत भारतानें ब्रिटनकडून गेल्या वर्षीच्या ह्याच तिमाहीपेक्षा बराच अधिक माल आयात केला आहे. विशेषतः एंजिनिअरिंग व यांत्रिक माल ह्या दोन बाबतींत निर्यात वाढण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. भारताच्या औद्योगिक विकासाविषयीं ब्रिटनमधील उद्योगपतींना खूपच आस्था वाटते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला साह्य करण्यासाठी उद्योगपतींप्रमाणें ब्रिटिश सरकारहि उत्सुक आहे. हिंदी बाजारपेठांकडे ब्रिटिश कारखानदार लक्ष देत नाहींत, हें म्हणणें चुकीचें आहे. खुद्द रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआनें प्रकाशित केलेल्या माहितीप्रमाणें १९५३ सालअखेर पूर्ण झालेल्या ५½ वर्षांच्या कालांत भारतांत गुंतविलेल्या ब्रिटिश भांडवलांत १३७ कोटी रुपयांची वाढ झालेली दिसून येते. त्यानंतरच्या कालांत भांडवलाच्या गुंतवणुकीच्या प्रमाणांत अधिकच वाढ झालेली आहे. सार्वजनिक मालकीच्या व खाजगी मालकीच्या, अशा दोन्ही क्षेत्रांत ब्रिटननें भारताला मदत केलेली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतानें १४ मोठ्या औद्योगिक योजना हातीं घेतल्या. त्यांपैकीं ७ योजनांत भारताला ब्रिटननें साह्य केलेलें आहे. रेल्वेचीं एंजिनें, टेलिफोनच्या तारा, स्फोटकें, विमानें, भारी विद्युत यंत्रसामुग्री व पोलादाचा कारखाना ह्याबाबतींत साह्य देण्यांत आलेलें आहे. ह्या उद्योगधंद्यांच्या बाबतींत जो माल ब्रिटननें पुरविला, तो इतर देशांशीं स्पर्धा करून पुरविलेला आहे.

खाजगी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत निदान १३४ ब्रिटिश कारखान्यांनीं तरी भारतांत कारखाने काढलेले आहेत. आणखीहि कांहीं कारखाने निघण्याचा संभव आहे. शिवाय कोलंबो–मदत योजनेंतील एक राष्ट्र म्हणून ब्रिटननें भारताला तांत्रिक ज्ञानाच्या बाबतींत मदत केलेली आहे. १९५० सालापासून कोलंबो–योजना अंमलांत आणण्यास प्रारंभ झाला. तेव्हांपासून १९५५ च्या मध्यापर्यंत तांत्रिक ज्ञानाच्या शिक्षणासाठी ८५८ विद्यार्थी ब्रिटनमध्यें आले. त्यांपैकीं २४५ भारतीय होते. त्याशिवाय निरनिराळ्या ज्ञानाच्या शाखांतील १५७ तज्ज्ञ ब्रिटनमध्यें अधिक अभ्यास करण्यासाठी आले. त्यापैकीं ६४ भारतीय होते. ब्रिटनमधील व्यापाराच्या पद्धतींत व मालाच्या निर्मितींत बरेच बदल अलीकडे होत आहेत. इतर देशांप्रमाणेंच ह्या बदलाची दखल घेणें भारतीयांच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. ब्रिटनमधील कांहीं धंद्यांची परिस्थिति थोडीशी चमत्कारिक झाली आहे ह्यांत शंका नाहीं. घरच्या बाजारपेठेंतील वाढती मागणी व चलनवृद्धि ह्यांच्यामुळें ही परिस्थिति उद्भवली आहे. तरीपण, सर्वच ब्रिटिश उद्योगधंद्यांची स्पर्धा करण्याची शक्ति वाढविण्याचा त्याचा विचार आहे. ब्रिटन करीत असलेल्या उपाययोजनेचा परिणामहि दिसूं लागला आहे. गेल्या वर्षीच्या शेवटच्या तिमाहींत ब्रिटननें परदेशी बाजारपेठांत माल पुरविण्याचीं २० टेंडरें भरलीं होतीं. त्यांपैकीं अवघीं चारच नामंजूर झालीं. भारतानें १६ टेंडर्स मंजूर केलीं होतीं. त्यांची मागणी पुरी करण्याची कामगिरी ब्रिटननें उत्कृष्टपणें पार पाडली. भारताचें उद्योगधंद्यांचें क्षेत्र वाढत चाललेलें आहे. ह्या वाढत्या पसाऱ्यांत ब्रिटिश व्यापाराला अधिकाधिक संधि मिळूं शकेल असें श्री. लो ह्यांना वाटतें.

---

## अहमदाबादसाठी दूध पुरविण्याची योजना

मुंबई सरकारचे मिल्क कमिशनर श्री. खुरोडी ह्यांनीं अहमदाबाद शहराला दुधाचा पुरवठा करण्याची योजना तयार केली आहे. ही योजना १९५८ च्या मध्याच्या सुमारास शहराचा दूधपुरवठा संपूर्णपणें आपल्या ताब्यांत घेईल. ती कार्यान्वित करण्यासाठी सुमारें ४० लाख रुपये खर्च येईल. ह्यासंबंधीची माहिती पत्रकारांना देतांना श्री. खुरोडी म्हणाले कीं, भारतीय सरकारकडे योजना मंजुरीसाठी धाडण्यांत आली असून कोलंबो मदतयोजनेप्रमाणें तीसाठी आर्थिक मदत मागण्यांत आली आहे. येत्या सप्टेंबरपर्यंत योजनेसंबंधीं अंतिम निर्णय घेण्यांत येईल, अशी अपेक्षा आहे. योजना चालू झाल्यानंतर तीन वर्षांनीं अहमदाबादचें कॉर्पोरेशन दररोज ५,००० बंगाली मण दुधाचा बटवडा करूं लागेल असा अंदाज आहे. सध्यां अहमदाबाद शहरांत दुधाचा व्यवसाय करणारे जे लोक आहेत, त्यांचाहि समावेश योजनेंत करतां येण्याची सोय ठेवली आहे. दूधपुरवठ्याची ही योजना संयुक्त राष्ट्रसंघटनेचे संबंधीं अधिकारी श्री. डेव्हिस ह्यांनीं आपल्या नजरेखालीं घातलेली आहे. ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं पश्चिम भारतांत दुधाच्या व्यवसायाची जोरानें प्रगति होत आहे. ह्या भागांतील दुधाच्या पुरवठ्याचा पाया मुंबई येथील योजनेनें घातला गेला. त्यानंतर पुण्याला दूधपुरवठ्याची योजना अमलांत आणण्यांत आली आणि आतां अहमदाबाद शहरासाठी तशीच योजना आखण्यांत आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेची संबंधित उपसंघटना ह्या कामीं जितकी मदत देतां येईल तितकी देत आहे. ह्याच प्रसंगीं अहमदाबादचे म्युनिसिपल कमिशनर श्री. राजपाल ह्यांनीं असें जाहीर केलें कीं, मुलांना मोफत दुधाचा पुरवठा करण्यासाठी अहमदाबादच्या कॉर्पोरेशननें दरसाल २ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. मुलांना दूध देण्याच्या योजनेचा विस्तार करतां यावा म्हणून कॉर्पोरेशननें संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या बालक-फंडाकडे मदत मागितली आहे.

## सहकारी सोसायटयांच्या कानू ३२ खालील नोटिसा

लेखक : स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल्. बी., पुणें

मुंबई सहकारी सोसायटयांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें कलम ५४ अन्वयें उपस्थित झालेल्या लवाददाव्यांचा निर्णय होणेसाठी अशा स्वरूपाचे लवाददावे रजिष्ट्रार्स नॉमिनीकडे पाठवले जातात. अशा प्रकारचे लवाददावे नॉमिनीकडे आलेनंतर कानू ३२ अन्वयें संबंधी पक्षकारांना लवाद बोर्डापुढें दावा चालवावयाचा आहे किंवा कसें ह्याबाबत इच्छा प्रदर्शित करून लवाद बोर्डाची मागणी करावयाचा हक्क सदरचे कानूनें सर्व पक्षकारांना दिलेला आहे. संबंधी पक्षकारांना सदरचे कानून्वयें दिलेला हक्क अत्यंत महत्त्वाचा असून त्या हक्काची जाणीव रजिष्ट्रार्स नॉमिनीनें दाव्याचे कागदपत्र आलेवर दाव्यांतील पक्षकारांना करून दिलीच पाहिजे असा दंडक आहे. एकादे वेळीं रजिष्ट्रार्स नॉमिनीनें कानू ३२ अन्वयें नोटिसा न करतां दाव्याचा निकाल केल्यास अशा स्वरूपाचा निकाल मुंबई को-ऑपरेटिव्ह ट्रायब्युनलकडे अपील करून फिरवून घेतां येतो. रजिष्ट्रार्स नॉमिनीनें कानू ३२ अन्वयें संबंधी पक्षकारांना नोटिसा केलेवर त्या नोटिसासंबंधीं पक्षकारांवर बजावून आल्या किंवा कसें ह्याबाबत खात्री करून घेतल्याशिवाय पुढील कामकाज पाहणें हें कायदेशीर होणार नाहीं. सदरच्या नोटिसा रजिस्टर्ड पोस्टानें पाठविल्या असल्यास व एकाद्या पक्षकारानें नोटिसा घेणेचें नाकारलें असें झाल्यास त्याबाबत जास्त चौकशी करून सदरचे पक्षकारानें नोटीस स्वीकारणेचें नाकारलें ह्याबाबत खात्रीलायक पुरावा पुढें आल्याशिवाय दाव्याचें पुढील काम करणें हितावह होणार नाहीं. गांवकामगारामार्फत बजावल्या जाणाऱ्या कानू ३२ खालील नोटिसांच्या स्थळप्रतीवर कांहीं वेळां "पक्षकार नोटीस घेत नाहीं" अशा स्वरूपाचा मजकूर लिहिलेला असतो व अशा प्रती रजिष्ट्रार्स नॉमिनीकडे परत पाठवल्या जातात. परंतु एवढ्यावर रजिष्ट्रार्स नॉमिनीचें काम संपत नाहीं. त्याबाबत अशा गांव-कामगारांकडून "पक्षकारानें नोटीस नाकारली" अशाबद्दल शपथेवर जबाब घेणें जरूर असतें.

वरील विवेचनावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, कानू ३२ अन्वयें ज्या नोटिसासंबंधीं पक्षकाराकडे बजावणीसाठी पाठविल्या जातात त्याची कायदेशीर व नियमाप्रमाणें योग्य बजावणी न झाल्यास त्यामुळें संबंधी पक्षकारांचे महत्त्वाचे हक्क हिरावून घेतले जाऊन लवादबोर्डापुढें दावा चालवावयाचा महत्त्वाचा व मूलभूत हक्क गमावला जाण्याची शक्यता निर्माण होणेचा संभव होतो. सदरचे कानून्वयें लवाद-बोर्डाची मागणी करणेचा हक्क ह्यासंबंधी पक्षकारांस नोटीस मिळाले तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत केव्हांहि बजावता येतो व त्याप्रमाणें पक्षकारानें सदरचे मुदतींत रजिष्ट्रार्स नॉमिनीस कळवल्यास, रजिष्ट्रार्स नॉमिनीस सदरचे पक्षकारांस कोणता प्रतिनिधी लवादबोर्डावर काम करणेसाठी पाठवावयाचा आहे अशाबाबत पुनः लिहावें लागतें. संबंधी पक्षकारांनीं कानू ३२ च्या नोटिसा मिळाल्यानंतर १५ दिवसांत कांहींच हालचाल केली नाहीं व लवादबोर्डाची मागणी केली नाहीं तर मात्र रजिष्ट्रार्स नॉमिनीस दावा पुढें चालवणेचा अधिकार प्राप्त होतो. दोन बाजूंपैकीं एका बाजूनें लवाद बोर्डाची मागणी केल्यास, उरलेल्या दुसऱ्या बाजूंपैकीं लवाद बोर्डावर मे. रजिष्ट्रार को. सो. यांना प्रतिनिधी पाठवणेचा अधिकार आहे. एका बाजूनें लवादबोर्डाची मागणी केलेवर दुसऱ्या बाजूनें जरी लवादबोर्डाची मागणी केलेली नसली तरी रजिष्ट्रार्स नॉमिनीस सदरचे दाव्याचे कागदपत्र मे. असिस्टंट रजिष्ट्रार को. सो. यांचेकडे पाठवावे लागतात व त्या परिस्थितींत प्रतिनिधी न दिलेल्या बाजूतर्फे योग्य सदस्याची निवड मे. असिस्टंट रजिष्ट्रार हे करून लवादबोर्ड अस्तित्वांत येते. लवाद दाव्यांत जेवढे पक्षकार सामील केलेले असतील त्या सर्वांना कानू ३२ अन्वयें नोटिसा केल्याच पाहिजेत. सदरच्या नोटिसा काढतांना मुख्य पक्षकार अगर दुय्यम पक्षकार असा भेदभाव रजिस्ट्रार्स नॉमिनीस करतां येत नाहीं. कारण मुख्य पक्षकार कोण हें ठरविणेचा अधिकार रजिस्ट्रार्स नॉमिनीस नाहीं. कानू ३२ चें योग्य परिपालन करणेबद्दल रजिस्ट्रार को. सो. ह्यांचेकडोन रजिस्ट्रार्स नॉमिनीकडे वेळोवेळीं परिपत्रकें पाठविलेलीं आहेत व त्यासंबंधी योग्य ती अंमलबजावणी न झाल्यास अशा रजिस्ट्रार्स नॉमिनींचीं नांवें यादींतून कमी करणेंत येतील अशा स्वरूपाचा इशाराहि सहकारी खात्यानें संबंधी रजिस्ट्रार्स नॉमिनींना दिलेला आहे.

---

### सिक्कीममधील ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन

सिक्कीम संस्थानांतील ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करण्यांत येणार आहे. ह्या कामीं भारतीय सरकार देणार असलेल्या २·२५ कोटी रुपयांच्या मदतीचा चांगला उपयोग करण्यांत येणार आहे. सिक्कीम संस्थानांत तिबेटी संस्थानाच्या पद्धतीच्या सतरंज्या व गालिचे, लोकरीचीं पांघरुणें, हस्तनिर्मित कागद व लांकडावरील नक्षीकाम, हे ग्रामोद्योग प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत. परंतु आतांपर्यंत ग्रामोद्योगांना सरकारी मदत अशी कधींच मिळालेली नाहीं. शिवाय, बाहेरून आयात होणाऱ्या यंत्रानें उत्पन्न केलेल्या वस्तूंची स्पर्धाहि ग्रामोद्योगाला भोंवत होती. सिक्कीमच्या महाराजांना हे धंदे टिकविण्याची इच्छा असूनहि पैशाच्या अभावीं त्यांना कांहीं करतां आलें नाहीं. आतां भारतीय मदतीमुळें हे ग्रामोद्योग टिकविणें शक्य होईल. सिक्कीमची राजधानी गंगटोक शहर येथें एक तांत्रिक शिक्षणाची संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या संस्थेंत सिक्कीम-मध्यें खास करून तयार होणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करण्यांत येईलच; पण त्याचबरोबर कामगारांना उपयुक्त असें शिक्षण मोफत देण्यांत येईल. सिक्कीममधून कातड्यांची बरीच निर्यात होते. त्यांचा उपयोग करून कातड्यांच्या वस्तु तयार करण्याचे छोटे उद्योगधंदे सरकार काढणार आहे. त्याशिवाय कागद तयार करण्यासाठी लागणारा लाकडाच्या गाभ्याचा लगदा आणि लाख ह्यांचेंहि उत्पादन हातीं घेण्याचा सरकारचा विचार आहे. भारताला सध्यां कागदाच्या कारखान्यांसाठी लगद्याची वाढती गरज भासत आहे. सिक्कीममधून तो स्वस्त मिळण्याची शक्यता आहे. भारतीय सरकारच्या मदतीनें सिक्कीममध्यें जलविद्युत् निर्माण करण्याच्या कांहीं योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. त्यांचें काम कसें काय चाललें आहे तें पहाण्यासाठी भारतीय सरकारनें आपला एक इंजिनिअर व पाट-बंधाऱ्यासंबंधीचे कांहीं अधिकारी सिक्कीमला धाडले आहेत.

---

**गोवा सरकारसाठी पडाव**—कराची येथें बोटी बांधण्याचा कारखाना नुकताच चालू करण्यांत आला आहे. कारखान्यांतून आपणांसाठी प्रत्येकीं २५० टन वजनाचे ६ पडाव बांधून मिळावे अशी मागणी गोव्याच्या सरकारनें केली आहे. ह्या पडावांसाठी १५ लाख रुपयांची रक्कम गोवा सरकारला खर्ची लागेल.

## रावसाहेब खोले ह्यांचा सत्कार

### आदर्श समाजसेवकाचा गुणगौरव

श्री. य. द. तथा रावसाहेब खोले, संचालक, भोर स्टेट बँक लि., ह्यांची राहुरी सहकारी कारखान्यांत मॅनेजर व सेक्रेटरी म्हणून दि. १५ मार्चपासून नेमणूक झाली आहे. श्री. खोले ह्यांनीं सहकारी व इतर क्षेत्रांत गेलीं २५ वर्षें आत्मीयतेनें व निःस्वार्थ बुद्धीनें जनतेची जी सेवा केली, त्याची जाणीव त्या त्या क्षेत्रांतील प्रत्येकास संपूर्णपणें आहेच. तथापि त्यांनीं १९४९ पासून भोर स्टेट बँकेचे संचालक मंडळावर येऊन बँकेचें दैनंदिन व्यवहारांत तन-मन-धन व बहुमोल वेळ अर्पण करून जें साहाय्य केलें, त्या त्यांच्या उपकाराचें अंशतः ऋण फेडण्याच्या दृष्टीनें बँकेतर्फे त्यांचा गौरवपर सत्कार डॉ. परुळेकर, संपादक 'सकाळ' ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भारत हायस्कूलच्या दिवाणखान्यांत रविवार, दि. १ रोजीं सायंकाळीं करण्यांत आला. जरी हा समारंभ भोर स्टेट बँकेतर्फे करण्यांत आला होता तरी त्याला आपोआपच व्यापक स्वरूप प्राप्त झालें आणि भारत हायस्कूलचा दिवाणखाना त्यांच्या चहात्यांनीं भरून गेला. बँकेचे अध्यक्ष, श्री. शिंगरे, ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर सुमारें १५ गृहस्थांनीं रावसाहेब खोले ह्यांच्या गुणवर्णनपर भाषणें करून त्यांच्या अनेक पैलूंची स्वानुभवाची माहिती सांगितली. श्री. नलावडे, श्री. भा. म. गुप्ते, श्री. ना. वि. भोंडे, रावसाहेब वैद्य, श्री. पाळंदे, श्री. कुलकर्णी, श्री. पाटसकर, श्री. पोपटलाल शहा, श्री. थोपटे, श्री. वाय्. एस. जोशी, इत्यादींनीं रावसाहेबांच्या थोरवीचें वर्णन केलें. त्या सर्वांनीं रावसाहेबांचा निःस्वार्थीपणा, स्वार्थत्याग, परिश्रम, चिकाटी, मनमिळाऊपणा, श्रद्धा, सचोटी, शिस्तपणा, प्रसिद्धि-पराङ्मुखता, साधेपणा, इत्यादींचा अनुभव सांगितला. रावसाहेबांना अहेर व वस्त्रें आणि सुमारें २५ हारतुरे अर्पण करण्यांत आल्यावर त्यांनीं अत्यंत सौजन्यपूर्ण शब्दांत आभार मानले. स्वतःच्या आयुष्यांत त्यांना ज्यांनीं प्रोत्साहन दिलें, मदत केली, मार्गदर्शन केलें, त्या सर्वांबद्दल त्यांनीं कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्ष, डॉ. परुळेकर, ह्यांनीं सांगितलें, कीं रावसाहेबांच्या इतक्या पैलूंचें एकत्र दर्शन घडून येण्याचा योग सत्कार-समारंभामुळें शक्य झाला. रावसाहेबांच्या नव्या व्यापक क्षेत्रांतील अडचणींचा त्यांनीं उल्लेख केला आणि रावसाहेबांना सर्वांच्या वतीनें सुयश चिंतिलें.

(रावसाहेब खोले पुणें म्युनिसिपालिटींत साधे लेखनिक होते; त्यापूर्वीं एका लायब्ररींत टेबलें झटकून पुस्तकें मांडण्याचें काम करीत. लहानपणींच वडील निवर्तल्यावर त्यांचें संगोपन मातुलगृहीं झालेलें व शिक्षणाचा लाभ फारसा न झालेला. अशा प्रतिकूल परिस्थितींतहि, त्यांनीं पुणें शहरांत, जिल्ह्यांत व महाराष्ट्रांत जें सार्वजनिक जीवनांत स्थान मिळविलें, तें केवळ अपूर्व आहे. स्वार्थत्यागपूर्वक जनसेवा, हा त्यांच्या जीवनाचा आधारस्तंभ आहे. आस्था आणि कळकळ ह्यांचेशीं वक्तशीरपणा व कार्यक्षमता ह्यांचा संयोग त्यांचे ठिकाणीं आढळतो, ही अत्यंत दुर्मिळ अशी गोष्ट आहे; त्याचें आम्हांस विशेष कौतुक वाटतें. त्यांना त्यांच्या नव्या जबाबदारीच्या जागीं आम्हीं त्यांना सुयश चिंतितों. —संपादक "अर्थ")

### रावसाहेब खोले ह्यांची राहुरी कारखान्यावर नेमणूक

राहुरी येथील सहकारी साखर-कारखान्याच्या मॅनेजरच्या व सेक्रेटरीच्या जागीं रावसाहेब य. द. खोले ह्यांची १५ मार्चपासून नेमणूक करण्यांत आली आहे. त्यामुळें त्यांच्या भोर स्टेट बँकेच्या डायरेक्टरशिपला बाध येणार नाहीं.

### बेळगांव बँकेचे चेअरमन, श्री. गो. वि. सराफ

बेळगांव बँक लि. च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या चेअरमनचे जागीं श्री. गो. वि. सराफ ह्यांची निवडणूक झाली आहे. श्री. सराफ हे बँकेचे चेअरमन पूर्वी होतेच. बेळगांव बँकेची प्रथा अशी आहे कीं, चेअरमनच्या कामाचा अनेकांना अनुभव मिळावा. भूतपूर्व चेअरमन डायरेक्टर म्हणून रहातातच.

### कंपनी कायद्याचें ३१४ वें कलम

कंपनीचा डायरेक्टर किंवा त्याचा कोणीहि नातेवाईक ह्यानें कंपनींत नोकरीवर किंवा नफ्याच्या जागीं रहाण्याबाबत, १९५६ च्या कंपनी कायद्यांतील ३१४ वें कलम पब्लिकप्रमाणें प्रायव्हेट कंपन्यांनाहि लागू आहे. प्रायव्हेट कंपन्यांना तें लागू नाहीं, असा झालेला गैरसमज दूर करण्यासाठीं भारत सरकारनें मुद्दाम खुलासा केला आहे.

### आय. ए. एस. मध्यें ४०० लोकांची भरती

इंडियन अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमध्यें तातडीच्या भरतीसाठी ४०० लोकांची 'खुल्या बाजारांतून' निवड करण्यांत यावयाची आहे. अनुभव असलेले लोक हवेत, ह्यासाठीं २५ ते ४० वर्षांच्या लोकांची निवड केली जाईल. राज्य सरकारांच्या अनुभवी अधिकाऱ्यांना भरतीसाठी अर्ज करतां येईल.

### युरोपसाठीं रशिआची योजना

युरोपांतील राष्ट्रांचें आर्थिक बाबतींत सहकार्य घडवून आणण्याची एक योजना रशिआनें तयार केली आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या युरोपविषयक आर्थिक कमिशनच्या कार्याशीं जुळती होईल अशा प्रकारची ही योजना आहे असें समजतें.


विक्रीस तयार

सन १९५५ अखेर सर्व सुधारणा समाविष्ट केलेलें
—एकमेव पुस्तक—

सन १९२५ चा मुंबईचा सटीक

**सहकारी मंडळ्यांबाबत अॅक्ट व त्याखालील कानू**

हायकोर्ट व को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलचे निकाल व ऑडिटबद्दलच्या संपूर्ण माहितीसह

किंमत रु. ८-८-०

पत्ता—द. ग. खांडेकर, १३१० कसबा, पुणें २.



तमाम दंतरोगांवर

☆ नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## बंदरांच्या विकासाची योजना

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालावधींत भारतामधील मोठ्या बंदरांच्या विकासाची योजना हातीं घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. सर्व योजना अंमलांत आणण्यासाठी सुमारें ६२·२८ कोटी रुपयांची रक्कम लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. पहिल्या कार्यक्रमांत मोठ्या बंदरांच्या सुधारणांसाठी ३५ कोटी रुपयांची रक्कम खर्ची पडणार होती. ह्या कार्यक्रमाच्या काळांत सुरू करण्यांत आलेली परंतु पूर्ण न झालेलीं अशीं कांहीं कामें आहेत. ह्या अपूर्ण कामासाठी दुसऱ्या कार्यक्रमांत २६ कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. अर्धवट स्थितींत असलेल्या कामांना दुसऱ्या कार्यक्रमांत अग्रहक्काचें स्थान देण्यांत आलेलें आहे. पण त्याशिवाय सुधारणा करण्यासंबंधीं कांहीं नव्या योजनांचाहि विचार चालू आहे. मोठ्या बंदरांत माल चढविण्याच्या व उतरण्याच्या ज्या सोयी सध्यां आहेत त्या अधिक परिणामकारक करण्याचा सरकारचा इरादा आहे. हें साध्य करण्यासाठी ह्या सोयींचें आधुनिकीकरण करणें जरूर आहे. त्याशिवाय बंदरांतील यांत्रिक साधनें कांहीं प्रमाणांत जुनीं झालेलीं आहेत. त्या साधनांच्या ठिकाणीं अद्यावत् साधनेंहि उभारण्यांत यावयाचीं आहेत. छोट्या बंदरांच्या विकासासाठींहि दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत एक योजना समाविष्ट करण्यांत आली आहे. तीसाठी सुमारें ५ कोटी रुपये खर्च येईल. पहिल्या कार्यक्रमांत छोट्या बंदरांच्या विकासाचीं जीं कामें हातीं घेण्यांत आलीं होतीं, तीं राज्य-सरकारें पार पाडीत आहेत. पहिल्या कार्यक्रमाप्रमाणें चालू करण्यांत आलेलीं कामें लवकरच पुरीं होतील. ह्या सर्व कामावर अंदाजें २·५ कोटी रुपये खर्च होतील. अपुरीं राहिलेलीं कामें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पुरीं करण्यांत येतील. अशा अपुऱ्या कामावर ३० लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च करावी लागणार नाहीं.

---

## दरसाल ५०,००० नवे डॉक्टर

जगांत सध्यां १२,००,००० डॉक्टर आहेत. ८५ देशांतील ५९५ कॉलेजांतून दरसाल ५०,००० ते ६०,००० नवे डॉक्टर तयार होऊन बाहेर पडत आहेत. जगाच्या २६५ कोटी लोकसंख्येंत डॉक्टरांची वाटणी मात्र विषम रीतीची आहे. उदाहरणार्थ, १४ देशांतील लोक नशीबवान आहेत; तेथें प्रत्येक १,००० लोकांच्या वाट्याला एक डॉक्टर येतो. दुसऱ्या टोकाच्या २२ देशांत, ३०,००० लोकांच्या वाट्यास एक डॉक्टर येणें सुद्धां कठीण. बाकीचे १२४ देश ह्या दोन्ही टोकांच्या मधें येतात. सर्वच देशांत ग्रामीण भागांत अधिक डॉक्टर्सची जरूरी असते, तर कांहीं शहरांत जरूरीपेक्षा अधिक डॉक्टर असतात. उत्तर आणि मध्य अमेरिकेंत २३·५ कोटी वस्तीस २,४७,००० डॉक्टर आहेत. युरोपच्या ६१·५ कोटी वस्तींत ६,४३,००० डॉक्टर आहेत. दक्षिण अमेरिकेची लोकसंख्या १२·१ कोटी असून तेथें ४८,५०० डॉक्टर आहेत. आशियाची लोकसंख्या १३७·१ कोटी एवढी प्रचंड असूनहि तेथें फक्त २,०१,५०० डॉक्टर आहेत. आफ्रिकेंत २३,२५० डॉक्टर २१·२ कोटी लोकांना औषधें देतात. भूमध्य सागराच्या पूर्वकडील प्रदेशांत ८·३१ लोकवस्ती व १७,००० डॉक्टर आहेत, तर ऑस्ट्रेलियांत १·४ कोटी लोकवस्तींत १२,००० डॉक्टर आढळतात.


दुसरी गुजराती आवृत्ति प्रसिद्ध झाली

**२ वर्षांत ४ आवृत्त्या**

# कण आणि क्षण

**( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )**

लेखक : श्री. वा. काळे

१ ली आवृत्ति ( मराठी ) ऑक्टोबर, १९५३
२ री आवृत्ति ( मराठी ) जुलै, १९५४
१ ली आवृत्ति ( गुजराती ) फेब्रुवारी, १९५५
२ री आवृत्ति ( गुजराती ) नोव्हेंबर, १९५५

" महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक, श्री. श्रीपाद वामन काळे, ह्यांनीं प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारें सुखी जीवनाची किल्लीच जणूं काय प्रत्येकाच्या हातीं दिली आहे. विषयाचें प्रतिपादन कलात्मक आणि सहज पटेल असें आहे. "

—दादासाहेब मावळंकर
( गुजराती प्रस्तावनेंत )

" प्रस्तुत पुस्तकावर महाराष्ट्रांतील समर्थ, विद्वान्, विचारक आणि साहित्यकार ह्यांनीं मुक्त हस्तानें व मुक्त कंठानें स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे. गुजरात आणि महाराष्ट्र ह्यांतील जीवन, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न ह्यांत किती साम्य आहे; त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील स्त्रियांचें जीवन हें शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या किती प्रगतिशील आहे, हें प्रस्तुत पुस्तक वाचत असतांना लक्षांत येतें. "

—प्रा. शशिन् ओझा
( गुजराती अनुवादक )

" पुस्तक स्त्री-वर्गालाच नव्हे, तर सर्वानाच उपयोगी व मार्गदर्शक असल्यानें, त्याचा प्रसार करण्यासाठी सस्तु साहित्य कार्यालयानें [ " सस्तु साहित्य म्हणजेच उत्कृष्टांत उत्कृष्ट साहित्य " ] तें प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचेंच आहे. "

—प्रा. अनंतराय रावळ
( गुजराती साहित्यिकांतील अग्रगण्य टीकाकार )

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, इरावती कर्वे, वि. द. घाटे, इंदिराबाई देवधर, त्याचप्रमाणें सर्व मराठी व गुजराती वृत्तपत्रें व मासिकें ह्यांचे अत्युत्कृष्ट अभिप्राय. डेक्कन व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीचा पुरस्कार व सरकारची मंजुरी.

मराठी पुस्तक : पृष्ठसंख्या १६८. किंमत २॥ रु.

सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे मिळेल.

## छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं सहकारी संस्था

### सोप्या अटीवर आर्थिक साहाय्य

छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांच्या विकासासाठी औद्योगिक सहकारी संस्थांना ज्या अटीवर आर्थिक साहाय्य देण्यांत येतें त्या अटी मुंबई सरकारनें ढिल्या केल्या आहेत.

सुधारलेल्या योजनेनुसार सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीज्, इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह बँका व स्टेट-को-ऑपरेटिव्ह बँक औद्योगिक सहकारी संस्थांना अडीच टक्के व्याजाच्या दरानें कर्जे देतील. आतांपर्यंत हा दर पांच टक्के होता. हीं कर्जे सामान्यतः एका वर्षांत परत करावीं लागतात. परंतु अपवादात्मक बाबतींत जॉइंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज् अॅण्ड व्हिलेज इंडस्ट्रिज् हे जास्तींत जास्त सहा महिन्यांपर्यंत मुदतवाढ देऊं शकतील. सहा महिन्यांची वाढीव मुदत संपल्यानंतरहि कर्जाची परतफेड केली नाहीं तर त्या मुदतीनंतर कर्जाची परतफेड होईपर्यंत त्यावर दरसाल एक टक्का या दरानें दंड म्हणून जादा व्याज आकारण्यांत येईल.

जॉईंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज् अॅण्ड व्हिलेज इंडस्ट्रिज् किंवा त्या विभागाचे डेप्युटी रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् किंवा जॉईंट रजिस्ट्रारांनीं अधिकार दिलेले अधिकारी यांच्या शिफारसीशिवाय कोणत्याहि सहकारी संस्थेस कर्ज मंजूर केले जाणार नाहीं.

भरणा झालेल्या शेअरभांडवलाच्या पांच पटीइतकी रक्कम अधिक राखीव निधी व इतर निधी व त्यांतून एकूण तोटा वजा करून जी रक्कम राहील त्यापेक्षा अधिक रकमेच्या खेळत्या भांडवलासाठी औद्योगिक सहकारी संस्थेस कर्ज मंजूर केलें जाणार नाहीं. तथापि खास अशा प्रकरणांत जॉईंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज् अॅण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज् यांची आगाव् परवानगी घेऊन त्यापेक्षा अधिक रकमेचीं कर्जे मंजूर केलीं जाऊं शकतील.


सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीज् वगैरेंनीं दिलेल्या कर्जाचा योग्य प्रकारें उपयोग होतो किंवा नाहीं. यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील. आणि कर्जाची वसुली करण्यासाठी त्यांना योग्य ते उपाय योजावे लागतील. तथापि सहकार खातें बँकांना आवश्यक ती सर्व मदत देईल.

सेंट्रल फायनान्सिंग एजन्सी वगैरेंनीं आणि जॉईंट रजिस्ट्रार अथवा त्यांनीं अधिकार दिलेला अधिकारी यानें मान्यता दिलेल्या इसमाची सेक्रेटरी किंवा मॅनेजर म्हणून नेमणूक केल्याशिवाय कोणत्याहि संस्थेला कर्ज मंजूर केलें.

सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीज, इंडस्ट्रिअल को–ऑपरेटिव्ह बँका व स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक यांना औद्योगिक सहकारी संस्थांना कर्जे देतां यावींत म्हणून सहकारावरील बँका वगैरेंना दरसाल अर्धा टक्का व्याजाच्या दरानें कर्जे देतील. हीं कर्जे त्यांना दहा वर्षांत दोन सारख्या हप्त्यांनीं फेडावीं लागतील.

औद्योगिक सहकारी संस्थांना कर्जे देण्यामुळें सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीज वगैरेंना जो तोटा सोसावा लागेल त्यापैकी ३/४ तोटा सरकार सोसेल व १/४ तोटा संबंधित बँकेस सोसावा लागेल.

ही योजना मागासलेल्या वर्गांतील इसमांच्या सहकारी संस्थांना लागूं नाहीं. तसेंच हत्यारें, साहित्य, शेडचें बांधकाम, गुदामें वगैरे बांधण्यासाठी ज्यांना आर्थिक मदत हवी असेल अशा संस्थांच्या बाबतींतहि ही योजना लागूं नाहीं. अशा संस्थांना वेगळ्या योजनाखाली आर्थिक साहाय्य देण्यांत येतें.




## रबर

(लेखक: गो. बा. सरदेसाई, क्युरेटर, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय व श्री. वि. गो. काळे, व्याख्याते लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय. पृ. सं. १९ किं. ६ आ.)

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या शिक्षणविभागाच्या विद्यमानें प्रसिद्ध झालेलें हें तिसरें प्रकाशन आहे. यापूर्वी 'रेशीम' व 'धायपात' हीं दोन पुस्तकें या विभागाच्या विद्यमानें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

संग्रहालयातर्फे प्रतिवर्षी प्रसिद्ध भारतीय उद्योगपती सर जमशेटजी टाटा यांचा जन्मदिवस साजरा करण्यांत येतो. या निमित्तानें प्रतिवर्षी ३ मार्च रोजीं कांहीं नवीन उपक्रम करण्याचा संस्थेनें गेलीं कांहीं वर्षे प्रघात चालू ठेवला आहे. ३ मार्च १९५६ रोजीं 'रबर' या विषयावरील प्रदर्शनाची जोड संग्रहालयास देण्यांत आली व या प्रसंगाचे निमित्तानें या विषयावरील हें छोटेंसें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

प्रकाशनें प्रसिद्ध करण्याचा प्रमुख हेतु औद्योगिक विषयाचें सामान्य ज्ञान व उद्योगधंद्यांसाठी लागणारा कच्चा माल, यंत्रसामुग्री, उत्पादन व खप यांची स्थूल कल्पना सर्वसामान्य जनतेस व विशेषतः विद्यार्थ्यांस देणें, हा आहे. शिक्षकांनाहि या प्रकाशनांचा उपयोग करून घेतां येईल.

प्रस्तुत पुस्तकांत रबराची लागवड, रबराचें झाड, चीक गोळा करणें, लॅटेक्स आटविणें, कच्चें रबर, गंधकीकरण, मिश्रणांतील इतर घटक, घट्ट रबराच्या वस्तू, लॅटेक्स रबराच्या वस्तू, रबराचे गुणधर्म, स्पंज व फोम्ड रबर, रबराचे उपयोग, कृत्रिम रबर, आणि भारतांतील कारखाने ह्या शीर्षकांखाली रबराच्या धंद्याविषयीं सर्वसामान्य माहिती सोप्या भाषेंत देण्यांत आली आहे. भारतांत रबराच्या वस्तू बनविणारे ३०० कारखाने असून त्यांत १८,००० कामगार आहेत व त्यांत १३ कोटी रु. भांडवल गुंतलेलें आहे. भारतांतील कारखान्यांच्या उत्पादनांतील प्रमुख बाबींचे आंकडे पुस्तकांत देण्यांत आले आहेत आणि शेवटीं संदर्भ ग्रंथांची यादी दिली आहे.

**हिंदी बोलपटांना अमेरिकेंत वाव**—अमेरिकेच्या चित्रपट संघटनेचे अध्यक्ष, मि. एरिक जॉन्स्टन ह्यांनीं वार्ताहर परिषदेंत असें सांगितलें कीं, भारतीय बोलपटांना अमेरिकेंत चांगला वाव आहे. परदेशीय बोलपटांच्या आयातीवर अमेरिका कर घेत नाहीं. विक्रयविद्या व धाडस ह्यांचा आधार घेऊन भारतीय निर्मात्यांनीं अमेरिकन बाजारपेठेचा उपयोग करून घेतला पाहिजे.

**पश्चिम जर्मनीची प्रगति**—गेल्या कांहीं वर्षांत पश्चिम जर्मनीनें औद्योगिक क्षेत्रांत चांगली प्रगति केल्याची माहिती श्री. एम. आर. मसानी ह्यांनीं सांगितली. ते पश्चिम जर्मनीचा दौरा करून परतले आहेत. औद्योगिक तंटे अगर कामगारांची गैरहजेरी, हे प्रकार तेथें दिसून येत नाहींत. पश्चिम जर्मनींतील उद्योगधंद्यांत कामगारांचें कारभारविषयक सहकार्य घेण्यांत येतें.

**ब्रह्मदेशाच्या पंतप्रधानांना भेट**— ब्रह्मदेशांतील राशिआच्या वकिलानें ब्रह्मी पंतप्रधान मि. ऊ नू ह्यांना आपल्या देशातर्फे दोन भव्य मोटारी भेटीदाखल दिल्या आहेत. दोन्ही मोटारी दिसण्यांत एकसारख्याच असल्या तरी त्यांतील एका मोटारीला गोळ्यांना दाद न देणाऱ्या कांचा बसविण्यांत आल्या आहेत. मोटारी अर्पण करण्यासाठी समारंभ करण्यांत आला होता.

**विमाव्यावसायिकांची तक्रार**—आयुर्विम्याचें राष्ट्रीयकरण करण्यांत आल्यानंतर विमेदारांना व एजंटांना शाश्वतीचा लाभ झाला. पण विम्याचें काम मिळविणारे जे संघटक आहेत, त्यांच्याकडे लक्ष देण्यांत आलेलें नाहीं अशी तक्रार करण्यांत येत आहे. कॉर्पोरेशनच्या शाखा अगर जिल्ह्या कचेऱ्या उघडतांना त्यांचा विचार घेतला जावा, असें सुचविण्यांत येत आहे.

**पूर्व पाकिस्तानसाठी भारतीय तांदूळ**—पूर्व पाकिस्तानमधील लोकांच्या तातडीच्या गरजा भागविण्यासाठी भारतीय सरकारनें १५,००० टन तांदूळ पुरविण्याचें कबूल केलें होतें. त्यांपैकी ७,००० टन तांदुळाचा पहिला हप्ता नुकताच पोंचता करण्यांत आला. उरलेला ८,००० टनांचा हप्ता खास गाड्यांनीं लवकरच रवाना करण्यांत येणार आहे. पूर्व पाकिस्तानला सामान्यतः २ लाख टन तांदुळाचा तुटवडा पडतो.

**दिल्ली ते मॉस्को विमानवहातूक**—दिल्ली आणि मॉस्को ह्यांच्या दरम्यान सरळ हवाई वहातूक लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. विमानमार्ग काबूलवरून आखण्यांत आला आहे. मॉस्कोला युरोपच्या मार्गानें जाण्यास जितका खर्च येईल त्यापेक्षा ह्या मार्गानें कमी खर्च येईल. वाहतूक सुरू झाल्यावर उभयता देशांतील प्रवासी वहातूक वाढण्याचा संभव आहे.

**पंचमहाल जिल्ह्यांत धरण**—पंचमहाल जिल्ह्यांतील नदीवर एक मोठें धरण बांधण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ६५ लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. धरणाची लांबी ३,००० फूट होईल व भिंतीची उंची ९५ फूट होईल. धरणापासून २० मैल लांबीचा कालवा काढण्यांत येईल व त्याच्या पाण्यानें २५,००० एकर जमिनीला पाणी पुरवितां येईल.

**कांडला बंदरांतील धक्के**—कांडला बंदराच्या विकासावर एकूण सुमारें १३·८३ कोटी रुपये खर्च होणार आहेत. बंदरांतील दोन मालवाहू धक्क्यांचें काम येत्या ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यांत येईल, व ते २ ऑक्टोबरपासून वहातुकीसाठी खुले करण्यांत येतील. हें बांधकाम पूर्ण झाल्यावर बंदराच्या विकासकार्यापैकीं जवळ जवळ ५० टक्के काम पूर्ण झालें, असें म्हणतां येईल.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.